# इटकू पिटकूंची सहल

सौ. शैलजा राजे

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय
दा. क्र.



IRBK-0114050

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

आवडत्या कथा : क्रमांक ११

# इटकू पिटकूंची सहल

*सर्वाधिकार प्रकाशकाधीन*

*प्रथमावृत्ती* : *सप्टेंबर १९६८*

*लेखक* : सौ. शैलजा राजे

*चित्रकार* : कृष्णा परब

*मुद्रक* : स. ना. तवकर
सोमैया पब्लिकेशन्स प्रा. लि. (मुद्रणालय),
वडाळा उद्योग भवन,
मुंबई–३१

*प्रकाशक* : कृ. रा. सामंत
सोमैया पब्लिकेशन्स प्रा. लि.,
मुंबई–१४

मूल्य पन्नास पैसे

दा. क्र. 98040 3५६८ वाचनालय ५६५०७
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा
अनुक्रम ... वि. ...
क्रमांक ...
नोंद दि. ...



# इटकू पिटकूंची सहल

म. ग्रं. सं. ठाणे वाचनालय शाखा.
अ. क्र. 98040 नों दि. ...
वि. ...


आईबरोबर इटकू-पिटकू काळोखातच सैपाकघरात लुडबुडत होते. ... कसा खमंग वास येत होता. काल रात्री तळून ठेवलेल्या पुऱ्यांच्य

IRBK-0114050

आणि आईने मिळून उवडले होते आणि पुऱ्यांवर चांगला ताव मारला होता. जवळच बटाटेही उकडून ठेवलेले होते. इटकू-पिटकूंना उकडलेले बटाटे फार आवडायचे. ते दोघे अगदी चवीने बटाटे चघळीत होते. तेवढ्यात आई ओरडली, "चला रे पळा घरात—"

आईला कुणाची तरी चाहूल लागली होती. आई ओरडली होती तरी इटकू-पिटकूंनी तिकडे फारसे लक्ष दिले नाही. आपली आई फार भित्री आहे असेच त्यांना वाटत होते. ते आपले बटाटे खाण्याचे काम अगदी रंगात येऊन उरकीत होते. इटकूने एक मोठ्याच्या मोठा बटाटा हातात घेतला आणि तो आता त्याचा लचका तोडणार तोच एकदम उजेडाने त्याचे डोळे दिपले. सैपाकघरात बाळाची आई आली होती. पिटकूला पहाताच तिने तोंडाने "काय मेल्यांचा कहार झालाय. कशीही झाकून ठेवा वस्तू. यांची धाड आहेच ........त्यावर!" असे म्हणत हातातले भांडे त्यांच्या दिशेने फेकले. पण इटकू-पिटकू केव्हाच निसटले होते. ते आपल्या बिळातून बाहेर लुकलुकत्या डोळ्यांनी पाहात होते. त्यांच्या आईने दोन तीन वेळा त्यांच्या शेपट्या ओढून त्यांना आत ओढण्याचा प्रयत्न केला. इटकू-पिटकूंनी 'अं, अं!' असा नाखुषीचा आवाज काढून 'आम्ही नाही जा!' असे सुनावले.

बाळाच्या आईने पावाची पेटी काढल्यावर तर इटकू-पिटकूंच्या तोंडाला भलतेच पाणी सुटले. आईने त्यावर लोण्याचा थरही चिकटवला. आता मात्र त्यांच्याच्याने घरात बसवेना. 'काहीही होवो, आपण बाहेर पडणारच' असे म्हणत दोघे आपल्या आईच्या दटावणीला न जुमानता बिळाच्या बाहेर पडले. आणि भिंतीला अगदी लगटून पळत सुटले. त्यांना माहीत



होते, असे पळाले की सहसा कोणाच्या लक्षात येत नाही. ते दोघे पळता पळता कशाला तरी थडकले. इटकू म्हणाला, "काय रे, आज कसली तरी गडबड दिसते. हा डबा कशाला मधेच असा ठेवलाय?"

"अरे आज भाऊ सहलीला जाणार आहे. आताच मी ऐकलं. आई त्याला उठवत होती. त्याच्यासाठीच मुद्दाम हा डबा काढून ठेवलेला दिसतोय बरं का."

"पिटक्या, अरे गंमत बघ. ते बघ त्या पिशवीत काय आहे."

"अरे खरंच! द्राक्षं, संत्री, चॉकलेटस्. मजा असेल रे सहलीला! इटकू, आपण जाऊ या का सहलीला?"

"सहलीला?" इटकू जरा विचारात पडला.

सहलीला जाण्यात मजा असणार हे तर दिसतच होते. जावेसे तर वाटत होते, पण जाणार कसे? आईला विचारले तर ती नक्कीच नाही म्हणणार. काय करावे बरे? आणि सहलीला जायचे तर कोणाबरोबर जायचे? छे! इटकूला काहीच सुचेना. तो आपली शेपटी हलवीत विचार करीत उभाच राहिला.

"ए वेड्या, असा किती वेळ विचार करणार रे तू? कोणीतरी येईल आणि मग सारे ऑफस होईल. झटपट काय ते ठरव."

"पिटक्या, सारं खरं; पण कसं जायचं काही कळत नाही बघ."

"इटक्या, सुचली रे युक्ती! अशी युक्ती सुचलीय की ज्याचं नाव ते!" पिटकू

आता." इटकू आळस देत म्हणाला.

थोड्याच वेळात भाऊ आणि त्याचे मित्र खेळायला दूर गेले, तसे इटकू–पिटकू सुळकन् बाहेर पडले व इकडे तिकडे पळत सुटले. झाडांच्या थंडगार सावलीत त्यांना खूपच मजा वाटत होती. इटकूने तर झाडावर चढायचाही थोडासा प्रयत्न केला, पण तेवढ्यात त्याच झाडावर एक कावळा येऊन बसला नि इटकूबुवा घाबरून खाली कोसळले. मग ते दोघे लपंडाव खेळले. पिटकू एका ठिकाणी लपून बसला होता. इटकू त्याला शोधत होता. पिटकू अगदी गुपचूप हालचाल न करता बसला होता. इटकू शोधून शोधून दमला अन् शेवटी एका कोपऱ्यात रुसून बसला. पिटकूला वाटले, आता इटकू लपला बरं का! मग पिटकू आपल्या जागेवरून हळूच उठला आणि त्याने इटकूच्या अंगावर उडी मारली. पण पिटकू ज्याला इटकू समजला तो होता एक लहानसा सरडा. पिटकूने उडी मारताच सरड्याने जोराने कोलांटी मारली तसा पिटकू आडवा तिडवा कोसळला. पिटकूची फजिती पाहून इटकूला आपले हसे आवरेना. त्याचा राग कुठेच पळून गेला. तो पोट धरधरून हसताना पाहून पिटकूलाही हसू आले. मग ते दोघे मिळून एकमेकांच्या अंगावर उड्या मारून खिदळू लागले. तेवढ्यात सारी मुले येताना दिसली तसे दोघे पटकन पळाले नि झाडामागे लपले.

मुले फराळाला बसली होती. मुलांचा फराळ चालू असता इटकू–पिटकू लुडबुडत होते. कुणाच्या पुढ्यातली पोळी पळव तर कुणाच्या कागदावरचा लाडू कुरतड असा मुलांच्या बरोबर त्यांचाही गमतीने फराळ चालला होता. इटकू–पिटकू रंगात आले होते, लोणी–पाव



खाण्यात गढून गेले होते. मध्येच कोणीतरी ओरडले "अरे, साप, साप !"

मुलांची तारांबळ उडाली. इटकू–पिटकूही घाबरले. मुलं भराभर उठली न् पळू लागली. कोणी दगड मारले, कोणी नुसतेच ओरडत सुटले. इटकू–पिटकूंना काय करावे कळेना. साप सरसर पुढे येत होता. इटकू–पिटकू रडायला लागले. अन् रडत रडत पळत सुटले. मुले भराभर आपल्या पिशव्या उचलीत होती. भाऊने पिशवी उचलायला अन् इटकू–पिटकूंनी पिशवीत उडी मारायला एकच गाठ पडली.

"शी, उंदीर !" असे म्हणून भाऊनी पिशवी खाली टाकली. सापाला दगड लागले होते पण त्यामुळं तो चिडून चिडून तसाच पुढे सरकत होता. आता मात्र इटकू–पिटकूंनी 'आईगऽ,' करून गळा काढला. त्यांचा आवाज ऐकून साप आणखीच जोराने पुढे सरकला. आता तो त्या पिशवीत शिरणार तोच एका मुलाने आपल्या हातातला मोठा दगड नेमका त्याच्या डोक्यात हाणला. साप झटकन् वळला पण पुढे सरकण्याचे मात्र आता त्याच्यात त्राण राहिले नाही. तो तिथेच तडफडत होता. मग साऱ्या मुलांनी त्याला चेचून चेचून ठेचून टाकले. इटकू–पिटकू आवाज न करता जीव मुठीत घेऊन पिशवीत बसून राहिले होते. त्यांची काहीच हालचाल होत नव्हती. भाऊने पिशवी उचलली अन् गळ्यात अडकवली. सारी मुले घरी निघाली.

वाटेत मुले म्हणत होती, "अरे त्या सापानं घाण केली रे, नाही तर आपण चांगले संध्याकाळपर्यंत बसलो असतो—"

इटकू–पिटकू एकमेकांना म्हणत होते, "सुटलो एकदाचे; आता परत असं आईला न विचारता धाडस करायचं नाही बरं कां!"

सहलीला जातानाचा त्यांचा उत्साह पार ओसरला होता. कधी एकदा आईला भेटतोय असे त्यांना झाले होते. ते एकमेकाला धरून पिशवीत बसून राहिले होते.

भाऊने घरात शिरल्याबरोबर पिशवी दूर कोपऱ्यात फेकून दिली. इटकू–पिटकू चांगलेच आदळले. पण त्याचे त्यांना भान नव्हते. पिशवी खाली टाकताच त्यांनी धूम ठोकली ती आपल्या बिळात! त्यांना पहाताच त्यांची आई धावत पुढे आली. त्यांच्या पाठीत रट्टे घालून म्हणाली, "कार्ट्यांनो, कुठं गेला होतात ? माझा जीव कसा उडून गेला होता."

आणि मग त्यांना मारता मारताच तिने त्यांना जवळ घेतले अन् त्यांचे पापे घ्यायला सुरुवात केली. आणि आईकडून त्यांचे पापे घेता घेता इटकू-पिटकू रडायला लागले. मग रडता रडता हसायला लागले आणि आईला म्हणाले, "आई, आम्ही सहलीला गेलो होतो. काय मजा आली म्हणून सांगू!"

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ७६५०१ दि ...
क्रमांक ... नोंद दि. 30/3/2001



## आवडत्या कथा :

१ *सशाची फजिती* ( शंभर पैसे )

२ *कोल्होबाची चंगळ* ( पन्नास पैसे )

३ *झाडाला जेव्हा पैसे लागतात* ( शंभर पैसे )

४ *खाशी जिरली वाघोबाची !* ( शंभर पैसे )

५ *जादूची पिशवी* ( पन्नास पैसे )

६ *शेपटी अर्धी, त्यात दिवाळीची गर्दी !* ( पन्नास पैसे )

७ *कोल्होबा जिंकले कोल्होबा हरले !* ( पन्नास पैसे )

८ *पारिजातक* ( पन्नास पैसे )

९ *मच्छरी शेटजी खीर खातात* ( पन्नास पैसे )

१० *पराक्रमी इटकू पिटकू* ( पन्नास पैसे )

११ *इटकू पिटकूंची सहल* ( पन्नास पैसे )

१२ *मनी हरवली, मनी सापडली !* ( शंभर पैसे )

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
ग्रा. क्र. १४०५० दि.
IRBK-0114050

सोमैया पब्लिकेशन्स प्रा. लिमिटेड

१७२ नायगांव क्रॉस रस्ता, दादर, मुंबई १४